**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१२/०८२०२६

***समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग***

***ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणांचे वाटप करणे कामी तपासणी शिबिराचे आयोजन***

वसई विरार शहर महानगरपालिका समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग तसेच भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री दिव्यशा केंद्रामार्फत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या *प्रभाग समिती 'ए' बोळींज, 'सी' चंदनसार व 'ई' नालासोपारा (प.)* या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील *६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी सहाय्यक उपकरणे मोफत वाटप* करण्याकामी *तपासणी शिबीराचे* आयोजन *वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दूसरा मजला, यशवंत नगर, विरार (प.)* येथे शनिवार *दि.१५/०८/२०२६* रोजी *सकाळी ०९.००* वाजता करण्यात आले आहे.

📅 *दिनांक* : १५ ऑगस्ट २०२६
⏰ *वेळ* : सकाळी ९.०० वाजता
📍 *स्थळ* : वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, यशवंत नगर, विरार पश्चिम

*तपासणी शिबिरासाठी पात्रता, निकष व आवश्यक कागदपत्रे :*
१) रेशन कार्ड पिवळे किंवा केशरी रेशनकार्डाची रंगीत स्वसाक्षांकित प्रत.
२) उत्पन्नाचा दाखला कुटुंबाचे उत्पन्न दरमहा रु.१५,०००/- किंवा वार्षिक रु.१,८०,०००/- च्या आत असल्याबाबतचा दाखला.
खालीलपैकी कोणताही एक दाखला ग्राह्य राहील :
* मा.नगरसेवक/नगरसेविका यांचा दाखला
* रेशनकार्डावर नमूद केलेले उत्पन्न
* स्वयंघोषणापत्र
३) वयाचा पुरावा
ज्येष्ठ नागरिक असल्याबाबत आधार कार्डाची स्वसाक्षांकित प्रत.

---

*महत्त्वाची सूचना :*
वर नमूद केलेल्या पात्र ज्येष्ठ नागरिकांनी तपासणी शिबिरासाठी येताना वरील कागदपत्रांसोबत मूळ रेशन कार्ड व मूळ आधार कार्ड स्वतः सोबत आणावे.
तसेच, वरील नमूद संस्थेकडून मागील तीन वर्षांत सहाय्यक उपकरणांचा लाभ घेतलेला नसावा.
सर्व पात्र ज्येष्ठ नागरिकांनी या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.